पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ७**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १४/५/२०१९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

## उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. २५**

उप आयुक्त, (परिमंडळ क्र. ५) चा माहे मार्च २०१९ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांचे जा.क्र. उआ–५/२४४ दि. ३०/४/२०१९ चे पत्र.

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. २६**

मा.ॲड्.अब्दुल गफुर पठाण यांचे दि. २/५/२०१९ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेस मिळकत कराच्या रुपाने विविध विकास कामांसाठी जास्त प्रमाणात तरतुद उपलब्ध होती. मागील अनेक वर्षांपासून या मिळकत कराच्या थकबाकीत वाढ होताना दिसत आहे व या थकबाकीवर दंड व शास्तीच्या रकमेमुळे मोठया प्रमाणात थकबाकीमध्ये वाढ झाली आहे. यामुळे मनपाच्या विविध विकास कामांवर परिणाम होत आहे. यासाठी सदर मिळकतदारांची थकबाकी वसुल करणेकामी विशिष्ट कालावधीसाठी दंड व शास्तीच्या रकमेत सुट देवून थकबाकी वसुल करण्यासाठी मिळकत कर अभय योजना सुरु करण्यात यावी.

**विषय क्र. २७**

मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. ३/५/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. १ क (कळस–धानोरी) खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.१ कोटी ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९–२०२० चे अंदाजपत्रक, पान क्र. २५४, कोड सीई२४अे१४१/एसजे३३–१०१, प्रभाग क्र. १ क (कळस–धानोरी) मधील स.नं. १९/४ येथील ॲमिनिटी स्पेसवर अग्निशामक केंद्र उभारण्याचे उर्वरित काम करणे. | १ कोटी ५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम– | | |
| १)प्रभाग क्र. १ क (कळस–धानोरी) मधील कळस– विश्रांतवाडी परिसरात सुरक्षेसाठी CCTV कॅमेरे बसविणे. | --- | १० लाख |
| २)प्रभाग क्र. १ क (कळस–धानोरी) मधील विविध ठिकाणी सुरक्षेसाठी CCTV कॅमेरे बसविणे. | --- | १० लाख |
| ३)प्रभाग क्र. १ क (कळस–धानोरी) मधील कळस स.नं. ११५ येथील ख्रिश्चन दफनभूमी मधील विविध विकासकामे करणे. | --- | १० लाख |
| ४)प्रभाग क्र. १ क (कळस–धानोरी) मधील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईनचे चेंबर वर उचलणे, साफसफाई व दुरूस्ती करणे. | --- | १० लाख |
| ५)प्रभाग क्र. १ क (कळस–धानोरी) मधील विविध ठिकाणी नागरिकांना बसण्यासाठी ग्रॅनाईट बेंच पुरविणे | --- | १० लाख |
| ६)प्रभाग क्र. १ क (कळस–धानोरी) मधील विविध ठिकाणी जेट मशिनने ड्रेनेज लाईन साफसफाई व दुरूस्ती करणे. | --- | १० लाख |
| ७)प्रभाग क्र. १ क (कळस–धानोरी) मधील नागरिकांना बसण्यासाठी लोखंडी बेंच पुरविणे. | --- | १० लाख |
| ८)प्रभाग क्र. १ क (कळस–धानोरी) मधील कळस स.नं. ११५ येथील मुस्लिम | --- | १० लाख |

| | | |
|---|---|---|
| दफनभूमी मधील विविध विकासकामे करणे. | | |
| ९)प्रभाग क्र. १ क (कळस-धानोरी) मधील विविध ठिकाणी नाल्यांची साफसफाई व दुरूस्ती करणे. | --- | १० लाख |
| १०)प्रभाग क्र. १ क (कळस-धानोरी) मधील विविध ठिकाणी पावसाळी लाईनची साफसफाई व दुरूस्ती करणे. | --- | १० लाख |
| ११)प्रभाग क्र. १ क (कळस-धानोरी) मधील विविध ठिकाणी पुणे मनपाच्या मिळकतींची रंगरंगोटी करणे. | --- | १० लाख |
| १२)प्रभाग क्र. १ क (कळस-धानोरी) मधील विविध ठिकाणी दिशादर्शक बोर्ड बसविणे. | --- | १० लाख |
| १३)प्रभाग क्र. १ क (कळस-धानोरी) मधील विविध ठिकाणीच्या रस्त्यावर स्पीड ब्रेकर बनविणे. | --- | १० लाख |
| १४)प्रभाग क्र. १ क (कळस-धानोरी) मधील विविध ठिकणी पुणे मनपाच्या मिळकतींचे सुशोभिकरण करणे. | --- | १० लाख |
| १५)प्रभाग क्र. १ क (कळस-धानोरी) मधील विविध ठिकाणी विविध विकास कामे करणे. | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. २८**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १/४/२०१९ ते दि.१५/४/२०१९ पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि-४/१८ दि.४/५/२०१९ चे पत्र.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. २९**

आरोग्य विभाग अंतर्गत सेंट्रल मेडिकल स्टोअर्स गाडीखाना येथील सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मधील उपलब्ध टेंडर प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/१९१ दि.२५/४/२०१९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. २ सन २०१९-२०२० चा विचारासाठी.

**विषय क्र. ३०**

बांधकाम विभागाकडील खराडी स.नं. ७२/२/१ (पा) येथील मान्य करण्यात आलेल्या संमतीपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२५४ दि. ६/५/२०१९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ३ सन २०१९-२०२० चा विचारासाठी.

**विषय क्र. ३१**

बांधकाम विभागाकडील बालेवाडी स.नं. २० आणि बाणेर स.नं. १०९ (पा), ११४ (पा) येथील मान्य करण्यात आलेल्या संमतीपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२५५ दि. ६/५/२०१९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ४ सन २०१९-२०२० चा विचारासाठी.

**विषय क्र. ३२**

मध्यवर्ती भांडार विभागाकडील सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी उपलब्ध करुन दिलेल्या निविदा प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२५१ दि. ६/५/२०१९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ५ सन २०१९-२०२० चा विचारासाठी.

**विषय क्र. ३३**

मध्यवर्ती भांडार विभागाकडील सन २०१५–१६ या आर्थिक वर्षासाठी उपलब्ध करुन दिलेल्या निविदा प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२५२ दि. ६/५/२०१९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ६ सन २०१९–२०२० चा विचारासाठी.

**विषय क्र. ३४**

मध्यवर्ती भांडार विभागाकडील सन २०१६–१७ या आर्थिक वर्षासाठी उपलब्ध करुन दिलेल्या निविदा प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२५३ दि. ६/५/२०१९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ७ सन २०१९–२०२० चा विचारासाठी.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्र. ३५**

पुणे पेठ सदाशिव स.नं ७२१/२ अ, फा.प्लॉट नं. ९८७ अ इंदुलाल कॅाम्पलेक्स येथील तिसऱ्या मजल्यावरील गाळा क्र. ३१४ बाबत मा.धीरज घाटे व मा. प्रकाश ढोरे यांचे दिनांक ११/१२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ३३० दि.१०/१/२०१९ ला अनुसरुन झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २२५२ दि.१८/२/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/माव्य/१४०१ दि.१८/२/२०१९ ने पाठविलेला अभिप्रायावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २६६६ दि. २७/२/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/माव्य/२४ दि.६/५/२०१९ ने पाठविलेला फेर अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्र. ३६**

विकास योजना पुणे स.नं. १२०अ, ब, १२४, अंतिम भुखंड क्र.५४५ पर्वती, सिंहगड रोड, पुणे या मिळकतीबाबत मा.दिलिप बराटे, मा.प्रिया गदादे व मा.सौ.मंजुषा नागपूरे यांचे दि. १६/१/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १८३१ दि.१६/१/२०१८ तसेच मा.अविनाश बागवे यांचे दि. २३/१/२०१८ चे फेरविचाराचे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २०१२ दि.२३/१/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/शअ/२१ दि.६/५/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. ३७**

पुणे महानगरपालिकेच्या शहर अभियंता कार्यालयाकडील श्री.गोपीचंद दत्तू पठारे, हुद्दा–बिगारी यांच्या निलंबनास दि. २८/२/२०१९ रोजी पहिली सहामाही पूर्ण झाली असून सदरची बाब मनपा सेवाविनियम क्र.५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/साप्र/१९ दि. ४/५/२०१९ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. ३८**

मा.सौ.अश्विनी कदम यांचे दि. ११/१२/२०१८ चे पत्र.

यंदाच्या वर्षी संपूर्ण महाराष्ट्रात पाऊस कमी पडल्यामुळे दुष्काळाची स्थिती निमार्ण झालेली आहे. शासनाने सुध्दा दुष्काळ जाहिर केलेला आहे. अशा परिस्थितीत पुणे शहरावर सुध्दा पाणी कपातीचे संकट आलेले आहे. पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या चारही धरणांमध्ये पाणीसाठा कमी झालेला आहे. पुढील पावसाळ्यापर्यंत पाणी काटकसरीने व काटेकोरपणे वापरावे लागणार आहे. येणाऱ्या उन्हाळ्यापर्यंत भीषण परिस्थिती निर्माण होऊ शकते.

त्यासाठी आत्ताच पुणे महानगरपालिकेने पाऊले उचलून पुणे शहरात होत असलेली कॉंक्रिट रस्त्यांची कामे व गल्लीबोळ कॉंक्रिटीकरण करणे किंवा तत्सम कामे ज्याला पाणी मुबलक लागते अशा कामांना बंदी घालावी व दुष्काळ्याचा परिस्थितीस सामोरे जाण्यासाठी योग्यती तयारी करावी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि.२६/३/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. ३९**

पुणे पेठ धनकवडी स.नं. २९ पार्ट येथील मान्य विकास आराखडयामधील ओटा मार्केट (ओ.एम–९१) व पोलिस चौकी (पी.सी.–२४) आरक्षीत मिळकतीस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४९(१) अन्वये बजाविलेल्या परचेस नोटीसच्या अनुषंगाने भूसंपादनाची कार्यवाही सुरु करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शअ/२० दि. ६/५/२०१९ चे पत्र.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**